# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

**वाहतूक खाते, मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४०००० ८**

**दूरध्वनी क्र.०२२-२३०२३९००.** **e mail: gmtraffic@msrtc.gov.in**


जा.क्र. राप / वाह / सामान्य /आतेप्र /४८१० दिनांक : ३० डिसेंबर ,२०२१

वाहतूक खाते परिपत्रक क्र. **०८ / २०२१**

**प्रती ,**

**उपमहाव्यवस्थापक, नियंत्रण समिती क्र. १ , २ , ३**

**विभाग नियंत्रक रा प . मुंबई / ठाणे /पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / नाशिक /अहमदनगर / धुळे / जळगांव / पुणे / सातारा /कोल्हापूर / सांगली / सोलापूर /औरंगाबाद / नांदेड / बीड / परभणी / उस्मानाबाद / लातूर / जालना /नागपूर /चंद्रपूर/ गडचिरोली / भंडारा / वर्धा / अमरावती / यवतमाळ / अकोला / बुलढाणा विभाग**

**विषयः "आवडेल तेथे कोठेही प्रवास" योजनेअंतर्गत दयावयाच्या पासाचे दर,अटी व शर्ती सुधारीत करणेबाबत**

**संदर्भ :** -१.वाहतूक खाते परिपत्रक क्र. १२/२०१८ जा.क्र.राप/वाह/चालन/सा-८८ / आतेप्र/२७४१ दिनांक १५ जून २०१८

वाहतूक खाते परिपत्रक क्र. ०६/२०२१ पत्र क्र. राप / वाह / चालन / सा-८८/ दिनांक २६.१०.२०२१ अन्वये रा प महामंडळाच्या विविध बससेवांचे प्रतिटप्पा दरात वाढ करण्यात आली आहे. नवीन टप्पा दरपत्रकाप्रमाणे येणा-या "आवडेल तेथे कोठेही प्रवास "योजनेचे पासाचे सुधारीत दर ,अटी व शर्ती लागू करण्यास सक्षम प्राधिकारी यांनी मंजुरी दिलेली आहे. सदरचे दर दिनांक **०५/०१/२०२२ ( दिनांक ०४ व ०५/०१/२०२२ च्या मधील मध्यरात्रीपासून )** पासून अंमलात आणावेत.

१. **<u>आवडेल तेथे कोठेही प्रवास पास योजनेसाठी हंगाम</u> -** यापूर्वी "आवडेल तेथे कोठेही प्रवास योजनेअंतर्गत देण्यात येणा-या पासांसाठी गर्दीचा हंगामसाठी व कमी गर्दीचा हंगामसाठी असे दोन स्वतंत्र दर निश्चित करण्यात येत होते. यामध्ये बदल करण्यात येत असून दोन्ही हंगामासाठी (पूर्ण वर्षासाठी) एकच दर आकारणी करण्यात यावेत .

२. **<u>आवडेल तेथे कोठेही प्रवास योजनेअंतर्गत पासाचे सुधारीत दर</u> -**"आवडेल तेथे कोठेही प्रवास पास योजनेअंतर्गत ७ दिवस व ४ दिवसांचे पास देण्यात येतात. सदर पासाचे सुधारीत दर खालीलप्रमाणे आहेत. सदरचे दर दिनांक **०५/०१/२०२२ पासून (दिनांक ०४ व ०५/०१/२०२२ च्या मधील मध्यरात्र)** पासून अंमलात येतील.

| सेवेचा प्रकार | **४ दिवसाच्या पासाचे मुल्य (पूर्ण वर्षासाठी)** | | **७ दिवसाच्या पासाचे मुल्य (पूर्ण वर्षासाठी)** | |
|---|---|---|---|---|
| | प्रौढ | मुले | प्रौढ | मुले |
| साधी (साधी, जलद,रात्रसेवा,आंतरराज्य शहरी/मिडीबस) | **११७०** | **५८५** | **२०४०** | **१०२५** |
| शिवशाही (आसनी ) आंतरराज्यासह | **१५२०** | **७६५** | **३०३०** | **१५२०** |

(वर दर्शविलेले मुलांच्या पासाचे दर ५ वर्षापेक्षा जास्त व १२ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी आहेत.)

**३. या योजनेचे मुख्य नियम खालीलप्रमाणे आहेत.**

१. या योजनेअंतर्गत ७ दिवस व ४ दिवसाचे पास दिले जातील.

२. साध्या सेवेचे पास सर्व प्रकारच्या साध्या बसेससाठी (साधी ,जलद ,रातरणी, मिडी ,शहरी ) आंतरराज्य मार्गासह ग्राहय राहतील.

३. निमआराम बससेवेसाठी स्वतंत्र दर निश्चित करण्यात आले नाहीत शिवशाही बससेवेसाठी देण्यात येणारा पास शिवशाही बससेवेसह साधी ,निमआराम,विनावातानुकुलीत शयन आसनी या सर्व सेवांसाठी आंतरराज्य मार्गासह ग्राहय राहील.

४. या योजनेअंतर्गत देण्यात येणारे पास १० दिवस अगोदरपर्यंत देता येईल.

५. "आवडेल तेथे कोठेही प्रवास "योजनेचे पास नियमीत बसेस सोबतच कोणत्याही जादा बसमध्ये तसेच यात्रेसाठी सोडण्यात येणा-या यात्रा बसमधे ग्राहय राहील.

६. सदर पासावर प्रवास करणा-या पासधारकांसाठी ते पासधारक आहेत म्हणून प्रवेश नाकारु नये .

७. आवडेल तेथे प्रवास पासधारकांसाठी बसमधील आसनाची हमी देता येणार नाही परंतु पासधारकास सदर पासावर आरक्षण आकार भरुन आसन आरक्षीत करता येईल.

८. या योजनेअंतर्गत प्रौढ पासधारकास ३० किलो व १२ वर्षाखालील मुलास १५ किलो प्रवासी सामान विनाआकार नेता येईल.

९. पासधारकास आंतरराज्य मार्गावर म.रा.मा.प.महामंडळाची बस जेथपर्यंत जाते तिथपर्यंत रा. प.बसने प्रवास करता येईल.

१०. पास हरविल्यास त्याचे ऐवजी दुसरा पास देण्यात येणार नाही. वा हरविलेल्या पासाचा कोणताही परतावा दिला जाणार नाही.

११. सदरचा पास अहस्तांतरणीय राहील.पासाचा गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास पास जप्त करण्यात येईल.

१२. प्रवासात वैयक्तिक वस्तु गहाळ झाल्यास अथवा कोणतेही नुकसान झाल्यास महामंडळ त्याची जबाबदारी स्विकारणार नाही.

१३. आवडेल तेथे प्रवास पास योजनेअंतर्गत देण्यात येणा-या पासाच्या दिवसाची गणना ००.०० ते २४.०० अशी करण्यात येईल . पासाचे मुदतीच्या शेवटचे दिवशी प्रवासी सदर पासावर २४.०० नंतर प्रवास करीत असेल तर पुढील प्रवासासाठी तिकीट घेणे आवश्यक राहील.

१४. काही वेळा रा प बस उशीरा सुटल्यामुळे,मार्गस्थ बिघाड झाल्याने अगर काही अपरिहार्य कारणामुळे जी बस नियोजीत पोहोचण्याची वेळ २४.०० पूर्वी होती ती २४.०० नंतर पोहोचत असेल व पासधारकाचा प्रवास खंडीत झाला नसल्यास पासधारकाकडून तिकीट आकार वसूल करु नये.

.. ३ ..

१५. राप / वाह / सामान्य - ८८ / ८०७२ दिनांक २.११.१९९८ - वाहतूक खाते परिपत्रक क्र.३०/१९९८ अन्वये दिलेल्या सुचनांनुसार घरातील नातलगाचा मुत्यू, भुकंप, आग लागणे, अतिवृष्टी, महापूर नैसर्गिक आपत्ती इत्यादी कारणांमुळे पासधारकास पास रद्द करावयाचा असल्यास व त्याने तसे प्रवासाच्या तारखेपुर्वी पुराव्यासह कळविले असल्यास प्रत्येक पासामागे रू.२०/- सेवा शुल्क वसुल करून उर्वरित रकमेचा त्यास परतावा देण्यात यावा.परंतु आशा बाबतीत सदर पासावर पुढील तारखेस प्रवास करण्याची प्रवाशाची इच्छा असल्यास त्याचा जुना पास रद्दकरून त्याला नावीन पास देण्यात यावा.व त्यासाठी सेवा शुल्क आकारणी करण्यात येऊ नये.

१६. संप / काम बंद आंदोलन यामुळे रा प वाहतूक बंद झाल्यामुळे प्रवासी सदर पासावर प्रवास करु शकत नाही. रा प वाहतूक बंद असल्यामुळे प्रवाशांचा कोणताही दोष नसताना प्रवाशी प्रवास करु न शकल्यास त्याने प्रवास न केलेल्या दिवसांचा परतावा /मुदतवाढ देणेबाबत वाहतूक खाते पत्र क्र. राप/वाह/सा/८८/५१५३, दि. २३.१०.२०१७ अन्वये सूचना प्रसारीत करण्यात आल्या आहेत. सदरची तरतूद यापुढेही सुरु ठेवण्यात येईल. वाहतूक सुरु झाल्यापासून ३ महिने पर्यंतच्या कालावधीत मुदतवाढ / परतावा देण्यात यावा.

१७. यापूर्वी दिलेल्या सुचनेनुसार १० दिवस अगोदरपर्यंत पासेस दयावयाच्या पध्दतीनुसार दिनांक ०५ /०१/२०२२ पुर्वी दिलेले परंतु दिनांक०५/०१/२०२२ पासून चालू होणारे किंवा ०५/०१/२०२२ ला चालू असलेले पास त्यांची मुदत संपेपर्यंत वैध राहातील व अशा पासधारकाकडून दरातील फरक वसूल केला जाणार नाही. परंतु आवडेल तेथे कोठेही प्रवास या योजनेतील झालेल्या दरातील बदलाची सूचना मिळाल्यानंतर दि. ०५/०१/२०२२ पासून लागू करावयाच्या व त्यासाठी वितरीत करावयाच्या पासेसना दिनांक ०५/०१/ २०२२ पासून लागू होणा-या दरांने आकारणी करावी.

१८. या योजनेत पासधारकाचा प्रवास संपल्यानंतर पास परत करावयाचा नसल्याने त्याचा गैरवापर टाळण्याच्या दृष्टीने सर्व तपासणी कर्मचा-यानी तसेंच वाहकांनी या पासावर प्रवास करणा-या पास धारकाच्या पासाच्या कालावधीची खात्री करावी.

१९. आगारातील व वाहतूक नियंत्रण केंद्रांवरील सर्व पास हे मार्गपत्रक संक्षेप , ९ कॉलम रजीस्टर, तिकीट साठा नोंदवहीनुसार तपासून,आगार लेखाकार , सहा.वाह.अधिक्षक व आगार व्यवस्थापक यांनी प्रमाणीत करुन विभागीय कार्यालयास पाठवावेत.

२०. नवीन पासांची छपाई होईपर्यंत सध्या चालनात असलेल्या शिल्लक पासांवर या कार्यालयाचे पत्र क्र. राप / वाह / चालन / सा.८८ / ४२११ दिनांक ३० जुलै, २०१२ मध्ये दिलेल्या सूचनेनुसार रबरी शिक्क्याने मुल्य बदलून त्याचा वापर करण्यात यावा. साधी , निमआराम , शिवशाही , आंतरराज्य असे स्वतंत्र पास बंद केले असल्याने सेवा प्रकाराचे दोन शिक्के तयार करण्यात यावेत. **नवीन मुल्याचा अंक प्रवाशांना स्पष्ट दिसणे आवश्यक आहे**. सदर बदल करताना त्याची नोंद, साठा नोंद वहीत करावी. सदरचे काम विभागीय कार्यालयात विभागीय लेखाअधिकारी यांचे वैयक्तिक देखरेखीखाली करण्यात यावे. नंतरच आगाराना पासेस वितरीत करावेत.

..४..

२०. नवीन दराच्या पासांसाठी विभागांनी आपली मागणी विभाग नियंत्रक, रा.प. मुंबई, भांडार विभाग, कुर्ला, रा.प.कुर्ला यांचेकडे नोंदवावी.

२१. नवीन मुल्याच्या पासांची छपाई करतांना सदर पासांचे मुल्य बदलत असल्यामुळे नवीन पासांना सांकेतिक क्रमांक देऊन ते छपाई करण्याबाबत महाव्यवस्थापक (यंअ) व महाव्यवस्थापक (भांवख) विनंती करण्यात येत असून महाव्यवस्थापक (यंअ) यांनी पासांना सांकेतिक क्रमांक दिल्यावर विभागांच्या मागणीनुसार महाव्यवस्थापक (भांवख) / विभाग नियंत्रक मुंबई यांनी पासांची छपाई करावी.

२२. स्मार्ट कार्ड योजनेअंतर्गत देण्यात येणा-या आवडेल तेथे प्रवास पासांसाठी वरील सूचना लागू राहतील.

सदर परिपत्रकात दिलेल्या सूचनाची अंमल बजावणी करून पुर्तता अहवाल दयावा.

परिपत्रकाची पोहोच द्यावी.

सही/-
**महाव्यवस्थापक (वाहतूक)**

प्रत: मा.अध्यक्षांचे स्वीय सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे सचिव याना विनंती करण्यात येते की, आवडेल तेथे प्रवास पास योजनेच्या दरातील बदलाबाबतची माहिती मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना अवगत करावी.

प्रत: मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) / महाव्यवस्थापक (भांवख) / महाव्यवस्थापक (यं.अ.) / महाव्यवस्थापक (नि व प) / महाव्यवस्थापक (बांधकाम ) /उपमहाव्यवस्थापक (मा व तं )मुख्य सांख्यिकी अधिकारी / मुख्य विधी अधिकारी / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / मुख्य कामगार अधिकारी यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत: जनसंपर्क अधिकारी, रा.प.मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी, त्यांना कळविण्यात येथे की, डिझेलच्या दरांत झालेल्या वाढीनुसार दिनांक २६.१०.२०२१ पासून भाडेटप्पा दरांत वाढ करण्यात आली असून सदरच्या भाडेवाढीस अनुसरून आवडेल तेथे कोठेही प्रवास योजनेच्या दरात दिनांक ०५/०१/२०२२ पासून वाढ करण्यात आली असून त्याची आवश्यक ती प्रसिध्दी वृत्तपत्र, टी.व्ही.इत्यादीच्या माध्यमातून प्रवाशांच्या माहितीसाठी करण्यात यावी.

प्रत: महाव्यवस्थापक (अपील), रा.प.पुणे / उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

प्रत: कार्यशाळा व्यवस्थापक, मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी/ औरंगाबाद / नागपूर.

प्रत: विभाग नियंत्रक (भांडार), भांडार विभाग कुर्ला, / अधिक्षक, रा.प.मुद्रणालय, मुंबई - ८६ याना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी. त्याना कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रकात नमूद केलेल्या आवडेल तेथे कोठेही प्रवास योजनेच्या पासांच्या दरात दिनांक ०५/०१/२०२२ पासून बदल झाल्याने महाव्यवस्थापक (यंअ) यांचेकडून नवीन पासाच्या मुल्याचे सांकेतिक क्रमांक मिळवून विभागाना त्यांचे मागणीनुसार नवीन मुल्याचे पास आवश्यकतेनुसार मुद्रीत करून ते वितरीत करावेत.

प्रत: मे.ट्रायमॅक्स आय टी इन्फ्रास्ट्रक्चर अँड सर्व्हिसेस लि.,कॅम्प संगणित्र शाखा, मध्यवर्ती कार्यालय, अॅनेक्स बिल्डींग,मुंबई यांस स्मार्ट कार्ड योजनेअंतर्गत देण्यात येणा-या आवडेल तेथे प्रवास पासामध्ये वरीलप्रमाणे बदल करण्यात यावेत.

**महाव्यवस्थापक (वाहतूक)**